
शैक्षणिक संदर्भ अंक १४३ (ऑगस्ट - सप्टेंबर २०२३)

# खेळ


लेखक : रघुवीर सहाय अनुवाद : सौमित्र



# खेळ

**लेखक : रघुवीर सहाय** **अनुवाद : सौमित्र**

कोपऱ्यावरच्या घरात एक सुतार काम करत होता. त्याने आत्ताच एक लाकडाची एक मोठी फळी ओढत ओढत बाहेर ओसरीवर आणली होती. तो छोटा बराच वेळ ते सुतारकाम बघत बसला होता. कोणतंही कौशल्य मोहक असतं; त्यातून हे काम तर मुलांना आवडण्यासारखंच होतं. छोटा बघत होता की सुताराने कसं एक




खडबडीत लाकूड कापून त्याचे मधोमध दोन भाग केले आणि नंतर त्यावर रंधा मारला. खर्र खर्र आवाज करत त्याने देवदारचे सुगंधी ढलपे काढले आणि आतला गुळगुळीत भाग दिसू

लागला. त्यावर लाकडाच्या रेषा, गोल गोल भोवऱ्यासारखी नक्षी, टवके, लांब लांब वर्तुळाकार रेषा, आणि मधोमध एक गाठ होती. जणू काही लपूनच बसलीय. त्याच्या मनात आलं असतं तर हे असं ठोकाठोकीचं काम त्यानेही केलं असतं. ठाकूनठोकून अवजारांच्या मदतीने एखादी गोष्ट तयार करायला त्याला आवडलंच असतं.

तिथे पडलेल्या एका लाकडाच्या तुकड्याने त्याचं लक्ष वेधून घेतलं. तो तुकडा काही सुताराच्या कामाचा नव्हता. तो त्याचं काहीतरी करू शकला असता. लहान मुलांना काय ! ती कोणत्याही वस्तूपासून काहीही बनवू शकतात. प्रथम त्याला जरा संकोच वाटला पण नंतर त्याने तो तुकडा उचलून घेतला. तो उलटापालटा करून बघण्याच्या नादात तो मैदानावर कधी आला हे त्याला कळलंच नाही.

त्या चौकोनी मैदानात ऊन पडलं होतं. त्याचं लक्ष विचलित झालं. तिथे काही मुलं खेळत होती, ते बघून क्षणभर तो विसरूनच गेला की तो त्या तुकड्याचं काहीतरी करणार होता. पण मग त्याने तो लाकडाचा तुकडा उंच उडवला, भिंगरीसारखा फिरत वर जाऊन तो पुन्हा खाली आला तेव्हा त्याने तो झेलला. अरे ! हा पण एक खेळ होऊ शकतो. आता तो त्याच खेळात रमला.



प्रत्येक वेळी तुकडा वर फेकायचा आणि पळत जाऊन झेलायचा. दरवेळी वाटायचं, आता त्याला नाही घेता येणार, पण तो बरोबर झेलायचा.

हळूहळू त्याला या खेळाचा कंटाळा येऊ लागला. या वेळी तुकडा खूपच उंच गेला, झेलू की नको हा विचार करत असतानाच तो त्याच्या डोक्यावर पडला. वाह... आता खेळात एक वेगळीच मजा आली ! थोडसं लागलं खरं पण मजा आली. आता हाच खेळ खेळू म्हणत त्याने पुन्हा तुकडा वर फेकला आणि डोक्यावर झेलायचा प्रयत्न केला. आता इथे खरी हुशारी होती. तुकडा खूप उंच जाऊन डोक्यावर आपटला नाही पाहिजे आणि खूप खाली राहिला तर झेलणार कसा ?

मी हाच विचार करत होतो की या खेळालाही हा मुलगा कंटाळला तर कोणता नवीन खेळ शोधून काढेल ? कदाचित तो तुकडा फेकून देऊन तो इतर मुलांबरोबर खेळायला जाईल. नेहमीचेच खेळ, चोर पोलीस नाहीतर लपाछपी...मग मात्र मी या मुलावर नाराज होईन. पण तेवढ्यात त्याने असं काही केलं की मी एकदम खुश झालो.

क्वार्टरमध्ये कोणाकडे तरी पाहुणे आले होते, त्यांची मोटार कार घेऊन. कार बाहेर उभी होती. छोटा कारच्या समोर उभा राहिला आणि लाकडाचा तुकडा त्याने नेम धरून कारच्या पलीकडे फेकला. इथे संतुलन फार महत्त्वाचं होतं. कारच्या मागच्या बाजूला जमिनीवर तुकडा पडेल इतकाच जोरात फेकायचा होता. लांब जाऊन चालणार नव्हतं. हा ताळमेळ साधण्यात मजा येत होती. गंमतशीरच खेळ होता तो ! तो इकडून तिकडे तुकडा फेकायचा आणि पळत जाऊन मागून घेऊन यायचा.

अचानक त्याच्या लक्षात आलं की पुढून मागे फेकण्यापेक्षा कारच्या एका बाजूने दुसरीकडे पण टाकता येईल. कारला रुंदी पण आहे ना.. मग तो उजवीकडच्या दाराकडून डावीकडे तुकडा फेकू लागला आणि मग डावीकडून उजवीकडे... मज्जा! पण आता मला

मात्र कंटाळा यायला लागला. पण तसं व्हायला नको होतं, कारण मुलगा आता अंतराच्या बाबतीतला नवा पैलू शिकत होता.

आता असं झालं, की इकडून फेकलेला तुकडा तिकडे पडलेला दिसलाच नाही. गायबच झाला. त्याने आजूबाजूला सगळीकडे शोधलं. गवतात, वाळूवर सगळीकडे.. अगदी



कारच्या खाली वाकून सुद्धा बघितलं. जवळून जाणाऱ्या मुलांनाही विचारलं पण मिळालाच नाही.

पण मुलगा हुशार होता. काय झालं असेल ते अचानक त्याच्या लक्षात आलं. तो कारच्या समोर आला आणि पुढच्या पट्टीवर बफरवर पाय देऊन वर चढू लागला. पट्टीवरून हेडलाईटवर आणि तिथून तो कारच्या बॉनेटवर आला. तिथे त्याने टाळ्या पिटत हलकेच थोड्या उड्या मारल्या,.. लाकडाचा तुकडा कारच्या छतावर आरामात पहुडला होता. त्याने हात लांबवून घेण्याचा प्रयत्न केला पण हात छोटा पडत होता. आता काय करावं.. तो हिमतीने गाडीच्या तिरप्या काचेवरून वर चढू लागला. मला त्याचे गोरे गोरे पाय आणि तपकिरी करडे बूट त्या काचेवरून घसरताना बघून खूप हसू आलं. मुलाने त्याचं खेळणं घेतलं आणि पुन्हा बॉनेटवर आला.

ऊन खूप छान होतं. हलकीशी वाऱ्याची झुळूक येत होती. जणूकाही उन्हाला बरोबर घेऊन चाललीय. हिरवगार गवत चमकत होतं. तो छोटा लाल चड्डी घालून त्या उंच भारी कारवर उभा होता. उन्हात त्याचा गोरा रंग, भुरे केस आणि निरागस डोळे उठून दिसत होते, जणूकाही चित्रच ! मला तर तो खूपच गोड दिसत होता, पण त्याला काय वाटत होतं कोणास ठाऊक. तो त्या बॉनेटवरून उतरलाच नाही. तिथेच उंचावर उभा राहून मैदानातल्या मुलांचा खेळ बघण्यात दंग झाला. तो लाकडाचा तुकडा आणि त्याचा खेळ तो विसरूनच गेला.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक १३३ मधून साभार.*

*§§§*

---

लेखक : **रघुवीर सहाय,** संवेदनशील हिंदी कवी, ‘प्रतीक’, ‘वाक’, ‘दिनमान’ आणि ‘कल्पना’ या वर्तमानपत्रांचे संपादक. आकाशवाणी हिंदी समाचार विभागाशी संबंधित. ‘दूसरा सप्तक’ या काव्यसंग्रहाला ‘साहित्य अकादमी’ पुरस्कार प्राप्त.

चित्रे : **शैलेश गुप्ता**, आर्किटेक्ट आणि चित्रकार. गोष्टी सांगणे आणि ऐकणे यात रुची.

अनुवाद : **सौमित्र**, सी. एम आर. सर्जीकल्स या रोबोटिक सर्जरी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीत कार्यरत. भाषांतराची आवड.

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला [sandarbh.marathi@gmail.com](mailto:sandarbh.marathi@gmail.com) वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*[www.sandarbhsociety.org](http://www.sandarbhsociety.org) या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***